न्यूज एक्सप्रेस मराठी
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दि. 19 फेब्रुवारी 2025 | पान- 1

# महापालिकेचा येत्या शुक्रवारी अर्थसंकल्प

## महापालिकेचा 43 वा अर्थसंकल्प : सलग तिसऱ्या वर्षी प्रशासकच अर्थसंकल्प सादर करणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेचा २०२५-२६ या आर्थिक वर्षांचा अर्थसंकल्प शुक्रवारी ( २१ फेब्रुवारी) प्रशासक तथा आयुक्त शेखर सिंह स्थायी समितीला सादर करणार आहेत. महापालिकेचा ४३ वा अर्थसंकल्प असून सलग तिसऱ्या वर्षी प्रशासकच अर्थसंकल्प सादर करणार आहेत. या अर्थसंकल्पात शहरवासीयांसाठी कोणत्या योजना, प्रकल्प असणार याची नागरिकांना उत्सुकता असणार आहे.



महापालिकेच्या लेखा व वित्त विभागाकडून २०२५-२६ चा अर्थसंकल्प तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. त्यासाठी विविध कामे, तरतुदींबाबत विभागनिहाय अधिकाऱ्यांच्या बैठका सुरू आहेत. सर्व विभागप्रमुखांची बैठक घेऊन अर्थसंकल्पाला अंतिम रूप देण्याचे काम सुरू आहे. यंदाचा ई-अर्थसंकल्प असणार आहे. अर्थसंकल्पात केंद्र शासनाच्या पुरस्कृत विविध योजना, प्रशासकीय सुविधा, विविध विकासकामे, आरोग्य, स्थापत्यविषयक कामे, शहरातील नागरिकांसाठी पायाभूत सुविधा, तसेच विविध विकासकामांसाठी अत्यावश्यक निधी, तरतुदी, महसूल आदी बाबींचा तपशील देण्यात येणार आहे.

### भाजप आमदारांचे बैठकांचे सत्र

अर्थसंकल्पात मतदारसंघात नवीन कामे, त्यासाठी जास्तीत-जास्त तरतूद करावी, यासाठी भाजपच्या चारही आमदारांनी महापालिका आयुक्तांसोबत स्वतंत्र बैठका घेतल्या. विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे आणि चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांनी गुरुवारी (१३ फेब्रुवारी) स्वतंत्रपणे बैठका घेत जास्तीच्या निधीची मागणी केली. गोरखे यांनी पिंपरीसाठी अधिकचा निधी देण्याची मागणी केली. तर, भोसरीचे आमदार महेश लांडगे यांनी शुक्रवारी (१४ फेब्रुवारी) आणि विधान परिषदेच्या आमदार उमा खापरे यांनी शनिवारी (१५ फेब्रुवारी) बैठक घेतली. यावरून भाजप आमदारांमध्येच निधी खेचून आणण्यासाठी रस्सीखेच दिसून आली. राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे आमदार अण्णा बनसोडे यांनी बैठक घेण्याचे टाळले.

### मागील पाच वर्षांतील अर्थसंकल्पाची आकडेवारी

- २०२०-२१ – सहा हजार ६२७ कोटी
- २०२१-२२ – सात हजार १३९ कोटी
- २०२२-२३ – सहा हजार ४९७ कोटी
- २०२३-२४ – सात हजार १२७ कोटी
- २०२४-२५ – आठ हजार ६७६ कोटी

### यंदा हवामान अर्थसंकल्पाचा समावेश

- वातावरणातील बदलामुळे नागरिक तसेच, प्राणी, पक्षी व निसर्गावर विपरित परिणाम होत आहे. त्यावर उपाययोजना करण्यासाठी महापालिकेने आराखडा तयार केला आहे. त्यानुसार सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात हवामान अर्थसंकल्पाचा समावेश केला जाणार आहे. शहराची हवा स्वच्छ राहण्यासाठी त्यासाठी विविध कामांचा समावेश असणार आहे.

# पवनाथडी जत्रेसाठी बचतगटांना लकी ड्रॉ पद्धतीने स्टॉलचे वाटप

## 21 ते 24 फेब्रुवारी या कालावधीत पी. डब्ल्यू. डी मैदान येथे पवनाथडी जत्रेचे आयोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तुंना उत्तम बाजारपेठ पवनाथडी जत्रेच्या माध्यमातून महापालिका उपलब्ध करून देत आहे. उत्पादनांची गुणवत्ता आणि विपणनाचा कौशल्यपूर्ण वापर करण्यावर बचत गटांनी भर द्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त तानाजी नरळे यांनी केले.

महानगरपालिकेच्या वतीने महिला व बाल कल्याण योजनेंतर्गत महापालिका हद्दीतील महिला बचतगटांनी तसेच वैयक्तिक महिलांनी तयार केलेल्या वस्तू उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, महिलांना विपणन कौशल्ये ज्ञात व्हावीत, एकूणच महिला उद्योजिका तयार होऊन महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हाव्यात यासाठी पवनाथडी जत्रेचे दरवर्षी आयोजन करण्यात येते. यावर्षी देखील २१ ते २४ फेब्रुवारी या कालावधीत सांगवी येथील पी. डब्ल्यू. डी मैदान येथे पवनाथडी जत्रेचे आयोजन करण्यात आलेले आहे. यामध्ये खाद्यपदार्थांसह विविध वस्तूंची विक्री व प्रदर्शन करणाऱ्या बचतगटांना पवनाथडी जत्रेतील स्टॉलचे वाटप लकी ड्रॉ पद्धतीने करण्यात आले त्यावेळी नरळे बोलत होते.



महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृह येथे पवनाथडी जत्रेत महिला बचतगटांना वस्तू विक्री व प्रदर्शनासाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या स्टॉल्सची सोडत सहायक आयुक्त तानाजी नरळे यांच्या हस्ते लकी ड्रॉ द्वारे पद्धतीने काढण्यात आली.

पवनाथडी जत्रेच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून महिला बचत गटांच्या उत्पादनांना एक खुले व्यासपीठ महापालिकेच्या वतीने उपलब्ध करून दिले जात आहे. यामुळे महिला बचत गट सक्षम बनत असून त्यांच्या दर्जेदार उत्पादनांना प्रसिद्धीदेखील मिळत आहे. पवनाथडी जत्रेत वस्तू विक्री व प्रदर्शनासाठी स्टॉल उपलब्ध व्हावेत यासाठी बचत गटांच्या प्रतिनिधींनी महापालिकेकडे अर्ज सादर केले होते. त्यानुसार सुमारे ७५० बचत गटांना लकी ड्रॉ द्वारे स्टॉल्स उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यामध्ये दिव्यांग तसेच तृतीयपंथीयांसाठी देखील काही स्टॉल्स राखीव ठेवण्यात आले आहेत, अशी माहिती सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे यांनी दिली.

यावेळी उपस्थित महिला बचत गटांच्या प्रतिनिधींच्या हस्तेही लकी ड्रॉ मध्ये असलेल्या चिठ्ठ्यांची निवड करण्यात आली आणि पवनाथडी जत्रेतील स्टॉल्सची निश्चिती करण्यात आली.

# ‘पीएमपी’कडून ससूनला रक्तपुरवठा..!

## दोन आगारांकडून दोन महिन्यांत 286 रक्ताच्या बॉटलचा ससून रुग्णालयाला पुरवठा

**पुणे | प्रतिनिधी**

सामाजिक बांधिलकी जपत, रुग्णांप्रती असलेली आपुलकी आणि शहरात सातत्याने रक्तपुरवठ्यामध्ये येणारा तुटवडा भरून काढण्यासाठी आता पीएमपीच्या ताफ्यातील सर्वच्या सर्व कर्मचारी रक्तदान करणार आहेत. ताफ्यातील 15 आगारांमार्फत ‘रक्तदान श्रेष्ठ दान’ म्हणत, रक्तदान केले जाणार आहे. आतापर्यंत दोन आगारांमार्फत 286 रक्ताच्या बॉटलचा ससून रुग्णालयाला पुरवठा करण्यात आला आहे.



पीएमपी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दीपा मुधोळ-मुंडे यांच्या संकल्पनेनुसार हा रक्तदान शिबिर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दर महिन्याला एका आगारातील कर्मचाऱ्यांमार्फत रक्तदान केले जात आहे. गेल्या दोन महिन्यांत दोन आगारांतील कर्मचाऱ्यांनी या उपक्रमात सहभाग घेत रक्तदान केले.

स्वारगेट आगारात 61 आणि न.ता.वाडी आगारात 225 रक्ताच्या बॉटलचे संकलन करण्यात आले. उर्वरित 13 आगारांमध्येही दर महिन्याला हे रक्तदान शिबिर होणार आहे. आगारांसह पीएमपीच्या मुख्यालयांमध्येदेखील असे शिबिर राबवण्यात येणार आहे. म्हणजेच एकूण 17 वेळा या रक्तदान शिबिराचे पीएमपीकडून आयोजन केले जाणार आहे.

या वेळी संकलित झालेल्या सर्व रक्ताच्या बॉटल ससून रुग्णालयाला देण्यात येणार आहेत. पीएमपीच्या ताफ्यात 10 हजारांपेक्षा अधिक कर्मचारी, अधिकारी आहेत. त्यांच्यामार्फत शहरासह अन्य भागातील गरजू रुग्णांना मोठी मदत होणार आहे. सर्वच्या सर्व कर्मचारी या शिबिरात आपला सहभाग नोंदवत असून, जास्तीत जास्त रक्ताच्या बाटल्यांचे संकलन करून ससून रुग्णालयाला दिले जाणार आहे, असे पीएमपी अधिकाऱ्यांनी सांगितले.

**पीएमपीकडील आगारे व मुख्यालयांमध्ये होणार रक्तदान**

1) मुख्यालय (स्वारगेट) - 1
2) मुख्यालय (पिंपरी-चिंचवड) - 2
3) स्वारगेट आगार
4) न.ता.वाडी आगार
5) कोथरूड आगार
6) कात्रज आगार
7) हडपसर आगार
8) अप्पर डेपो
9) पुणे स्टेशन
10) निगडी
11) भोसरी
12) पिंपरी
13) भेकराईनगर
14) शेवाळवाडी
15) बालेवाडी
16) बाणेर
17) वाघोली

### शिवजयंतीच्या दिवशी कात्रज आगारात शिबिर

» पीएमपीने आतापर्यंत दोन आगारांमध्ये यशस्वीरीत्या रक्तदान शिबिरे आयोजित केली. त्या शिबिरांमार्फत 286 रक्ताच्या बॉटलचे संकलन झाले आहे. या रक्ताच्या बाटला ससून रुग्णालयाला देण्यात आल्या आहेत. येत्या 19 फेब्रुवारीला म्हणजेच छत्रपती श्रीशिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त कात्रज आगारात रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाणार आहे. या वेळी कात्रज आगाराच्या आगार व्यवस्थापकांसह अन्य अधिकारी, कर्मचारी, चालक-वाहक रक्तदान करणार आहेत.

“ पीएमपीएमएल अध्यक्ष दीपा मुधोळ-मुंडे यांच्या संकल्पनेनुसार आम्ही हा रक्तदान शिबिराचा उपक्रम राबवत आहोत. आमच्याकडील 15 म्हणजेच सर्वच्या सर्व आगारांमधून ससून रुग्णालयाला सामाजिक बांधिलकी जपत रक्तपुरवठा करणार आहे. हा उपक्रम प्रत्येक आगारात महिन्याला होत असून, आतापर्यंत दोन आगारांमार्फत 286 रक्ताच्या बॉटल ससून रुग्णालयाला देण्यात आल्या आहेत.

**- किशोर चौहान, जनसंपर्क अधिकारी, पीएमपीएमएल.**

# कुदळवाडीत सात दिवसांच्या धडक कारवाईनंतर मोहीम स्थगित

## करवाई मोहिमेत तब्बल 825 एकर जागेतील 4 हजार 111 पत्राशेड ‘भुईसपाट’

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली येथील कुदळवाडी परिसरात आरक्षित जागेवरील अनधिकृत बांधकामे व पत्राशेडवर पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाने शनिवार (दि.८) पासून धडक कारवाई सुरू केली. ती कारवाई शुक्रवार (दि.१४) पर्यंत सलग सात दिवस सुरू होती. या करवाई मोहिमेत तब्बल ८२५ एकर जागा रिकामी करण्यात आली असून, तब्बल ४ हजार १११ भंगार गोदामे, लघुउद्योग व इतर आस्थापना भूईसपाट करण्यात आल्या आहेत. त्यामुळे हा निर्मनुष्य परिसर भयान दिसत आहे. ही कारवाई स्थगित करण्यात आली आहे.



पहाटे पाच वाजल्यापासून महापालिका व पोलिस विभागांची यंत्रणा एकत्रित येऊन ही कारवाई मोहीम सक्तीने राबवित होती. जेसीबी, पोकलेन, क्रेन, कटरच्या सहाय्याने अनधिकृत पत्राशेड, कारखाने, गोदाम, दुकाने आणि पत्राशेड तोडण्यात आले. पहिल्या दिवशी खरबदारी म्हणून त्या भागांतील इंटरनेट सुविधा बंद करण्यात आली होती. तेथील प्रमुख व्यावसायिक व पदाधिकाऱ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते.

व्यावसायिक, लघुउद्योजक, राजकीय नेते, लोकप्रतिनिधी, मंत्री, पदाधिकारी व माजी नगरसेवकांचा दबाव झुगारून ही कारवाई सलग सात दिवस करण्यात आली. त्यासाठी महापालिकेने स्वतंत्र पथकच तयार केले होते. आवश्यक यंत्रसामग्रीसह मोठा पोलिस बंदोबस्तात पार पडली. पहाटे पाचला सुरू होणारी कारवाई सायंकाळी सहाला थांबविली जात होती. या कारवाईत तब्बल ४ हजार १११ आस्थापना पाडण्यात आल्या. त्यात एकूण ८२५ एकरचा परिसर अतिक्रमणमुक्त करण्यात आला आहे. रस्त्यासाठी आरक्षित असलेल्या जागेत डांबरीकरण करण्यात येत असून, सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत.

# भंगार व्यावसायिकांना कुरुळी हद्दीत 'नो एंट्री'

## कुरुळी ग्रामपंचायतीचा निर्णय कुदळवाडीसारखा बकालपणा वाढण्याची भीती

**पिंपरी | प्रतिनिधी**

प्रदूषण करणाऱ्या भंगार व्यावसायिकांना जागा देऊ नये, तसेच अशा व्यवसायांना परवानगी न देण्याचा निर्णय कुरुळी ग्रामपंचायतीने घेतला आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने चिखली-कुदळवाडी येथे मोठ्या प्रमाणात अतिक्रमण कारवाई करत भंगार गोदामांसह हजारो लघुउद्योग आणि व्यावसायिकांवरही बुलडोझर फिरवला आहे.

परिणामी, त्यांचे कोट्यवधींचे नुकसान झाले असून, त्यांना आता पुन्हा व्यवसाय उभारणीसाठी नवीन जागेसाठी धावाधाव करावी लागत आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेने कुदळवाडी येथे केलेल्या कारवाईत आत्तापर्यंत सुमारे 2 हजार 845 अनधिकृत बांधकामे भुईसपाट केली आहेत.



या कारवाईमुळे हजारो उद्योग व व्यवसाय उघड्यावर आले असून, मशिनरी व मालाचे प्रचंड नुकसान झाले आहे.

संबंधित उद्योजक व भंगार व्यावसायिक आता चाकण एमआयडीसी व लगतच्या गावांमध्ये व्यवसायासाठी जागेचा शोध घेत आहेत. त्यासाठी जादा भाडे देण्याची तयारीही दाखवीत आहेत.

या भंगार व्यावसायिकांना किंवा इतरांना जागा भाड्याने दिल्यास कुदळवाडीसारखा बकालपणा गावात निर्माण होईल का, अशी भीती महाळुंगे, कुरुळी, मोई, चिंबळी, निघोजे येथील ग्रामस्थांना वाटत आहे. त्यासाठी जागा भाड्याने देताना व्यवसायाच्या प्रकाराची माहिती घेत व्हेरिफिकेशन करावे. प्रदूषण होणारा व्यवसाय तसेच भंगार दुकानांना जागा देऊ नये. तसेच, वाहतुकीला अडथळा करू नये आदी नियम व्यावसायिकांना लावले जात आहेत.

### मोकळ्या जागांचे भाडे वाढले

» पिंपरी-चिंचवड शहरापासून शेजारी असलेल्या चाकण, महाळुंगे, कुरुळी, मोई, चिंबळी, निघोजे तसेच औद्योगिक परिसरात जागेचा शोध त्यांच्याकडून घेतला जात आहे. मात्र, जागेला अचानक मागणी आल्याने जागा विक्रीची किंमत आणि भाड्यात मोठी वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे. तसेच, महापालिका हद्दीलगतच्या गावांतील ग्रामपंचायतींनी हद्दीतील जागा मालकांना भंगार व्यावसायिकांना मोकळी जागा व गोदामे भाड्याने देऊ नये, असे पत्र काढले आहे. जागा भाड्याने दिल्यास त्यांना कुठल्याही प्रकारच्या परवानग्या मिळणार नाहीत, असेही या पत्रात म्हटले आहे.

> कुरुळी हद्दीत भंगार दुकानांना जागा भाड्याने किंवा विकत देऊ नये. या भंगार दुकानांमुळे परिसरात प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. अशा त्रासदायक व्यवसायास ग्रामपंचायतीकडून कुठलीही परवानगी दिली जाणार नाही.
> - अनिता राजेंद्र बधाले, सरपंच, कुरुळी

# गृहप्रकल्पांना राज्याकडून ईसी दाखला

## 20 हजार स्क्वेअर मीटरवरील बांधकामावरील केंद्राची सक्ती मागे : बांधकामांना मिळणार परवानगी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील २० हजार चौरस मीटर क्षेत्रफळाची मोठी बांधकामे व गृहप्रकल्पांना केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाचा ई. सी. दाखला घेणे बंधनकारक केले होते. त्यामुळे महापालिका हद्दीतील नवीन बांधकामाच्या फाईल्स रखडल्या होत्या. मात्र, आता केंद्राच्या ई. सी. दाखला (एन्व्हायर्नमेंट क्लिअरन्स सर्टिफिकेट) देण्याची सक्ती मागे घेण्यात आली आहे. तो दाखला आता राज्य सरकारची समिती देणार आहे.

या नव्या निर्णयामुळे शहरातील रखडलेल्या अनेक मोठ्या प्रकल्पांना मुदतीमध्ये परवानगी मिळण्यास मदत होणार आहे. परिणामी, महापालिकेच्या बांधकाम परवानगी विभागाचे उत्पन्नात मोठी भर पडणार आहे. पुण्यासह पिंपरी-चिंचवड शहर अतिप्रदूषित होत आहे. प्रदूषण अतिहानीकारक स्थितीत पोहोचल्याने केंद्रीय पर्यावरण विभागाने २० हजार चौरस मीटर क्षेत्रफळाच्या मोठ्या बांधकाम प्रकल्पांना केंद्रीय पर्यावरण समितीकडून ई. सी. दाखला घेणे बंधनकारक केले होते. परंतु, ई. सी. दाखला मिळवण्याची प्रक्रिया पूर्णपणे किचकट असल्याने बांधकाम परवानगीसाठी महापालिकेकडे येणारे गृहनिर्माण प्रकल्प चार महिन्यांपासून ठप्प झाले होते. त्यामुळे महापालिकेच्या बांधकाम प्रकल्पातून मिळणारे उत्पन्न चार महिन्यांपासून घट होऊन शहर विकासावर त्याचा विपरीत परिणाम होऊ लागला होता.



परंतु, आता केंद्राऐवजी पूर्वीप्रमाणे राज्य सरकारची समिती मोठ्या बांधकाम प्रकल्पांना मान्यता देणार आहे. त्यामुळे परवानगीची प्रक्रिया वेगात पूर्ण होऊन मोठ्या प्रकल्पांना चालना मिळणार आहे.

तसेच, महापालिकेने मोठ्या प्रकल्पास परवानगी देण्यास एप्रिल २०२४ पासून बंद केले होते. परिणामी अनेक प्रकल्प केंद्राच्या परवानगीअभावी रखडून पडले होते. केंद्राची परवानगी न घेता काम सुरू केल्याने ८ ते १० प्रकल्पांवर कारवाईही करण्यात आली. या सक्तीविरोधात काही बांधकाम व्यावसायिक न्यायालयात गेले होते. अखेर, केंद्राऐवजी राज्य सरकारची समिती ईसी दाखला देणार आहे. समितीकडून मोठ्या प्रकल्पांसाठी वेगाने कामकाज केल्यास त्यांना ईसी दाखला वेळेत मिळून बांधकाम सुरू करणे सुलभ होणार आहे.

दरम्यान शहरातील मोठ्या प्रकल्पांना भोपाळ येथील केंद्राच्या पर्यावरण विभागाकडून ईसी दाखला घेणे बंधनकारक केले होते. त्याचे अधिकार आता केंद्राकडून राज्य सरकारच्या समितीकडे वर्ग करण्यात आले आहेत. राज्यातील समिती दाखले देणार असल्याने शहरातील बांधकाम प्रकल्पांना गती मिळेल. त्यातून बांधकाम परवानगी विभागाच्या उत्पन्नात मोठी भर पडणार आहे, असे महापालिकेचे शहर अभियंता मकरंद निकम यांनी सांगितले.

### नागरिक, बांधकाम व्यावसायिकांना दिलासा

» राज्य शासनाने २० हजार चौरस मीटर (२० लाख चौरस फूट) क्षेत्रफळावरील बांधकामांसाठी पर्यावरण विभागाचा दाखला बंधनकारक केला आहे. मात्र, पिंपरी-चिंचवड शहराचा अतिप्रदूषित देशातील शहराच्या यादीत समावेश झाल्याने राष्ट्रीय हरित लवादाने त्या प्रकल्पासाठी केंद्राच्या पर्यावरण समितीकडून पर्यावरण दाखला घेणे २०२४ पासून बंधनकारक केले. त्यामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील मोठ्या बांधकामांना केंद्राच्या पर्यावरण विभागाकडून दाखला घ्यावा लागत आहे. तो दाखला मिळण्यासाठी बरीच खटाटोप करावी लागत असून, त्यात अधिक वेळ जात असल्याने विकसक तसेच, बांधकाम व्यावसायिक त्रस्त झाले होते.

# खासगी 'आरओ' प्रकल्पांबाबत महापालिकेचा मोठा निर्णय!

## महापालिकेने सुमारे 55 'आरओ' प्रकल्पांवर कारवाई करत त्यांना टाळे ठोकले



**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील सिंहगड रस्त्यावरील खडकवासला, किरकिटवाडी भागात गुइलेन बॅरे सिंड्रोमचे (जीबीएस) रुग्ण आढळून आले होते. या भागाला ज्या खासगी शुद्धीकरण प्रकल्पातून (आरओ) पाणी दिले जाते, ते पाणी दूषित असल्याचे समोर आल्यानंतर जागे झालेल्या महापालिका प्रशासनाने खासगी 'आरओ' प्रकल्पांसाठी नियमावली तयार केली आहे. यामध्ये संबंधित प्रकल्पातील पाण्याची वारंवार तपासणी करवून घेण्याचे बंधन प्रकल्प चालविणाऱ्यावर घालण्यात आले आहे.

शहरात गेल्या काही दिवसांपासून जीबीएस रुग्णांची संख्या वाढत असल्याने त्याची गंभीर दखल घेत आवश्यक त्या उपाययोजना करण्यास महापालिका प्रशासनाने सुरुवात केली आहे. या भागातील नागरिकांना ज्या खासगी प्रकल्पांतून पिण्यासाठी पाणी दिले जाते. त्याचे नमुने महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने तपासण्यासाठी पाठविले होते. हे पाणी पिण्यास योग्य नसल्याचा अहवाल आल्याने महापालिकेने सुमारे ५५ 'आरओ' प्रकल्पांवर कारवाई करत त्यांना टाळे ठोकले आहे.

महापालिकेने हे खासगी प्रकल्प तात्पुरते बंद केले असले, तरी त्यामधून लपून पाणी दिले जात असल्याच्या तक्रारी महापालिकेकडे करण्यात आल्या होत्या. पाणी देणारे खासगी 'आरओ' प्रकल्प राजकीय व्यक्तींशी संबंधित असल्याने कारवाई करण्यासाठी गेलेल्या महापालिकेतील अधिकारी, कर्मचारी यांच्यावर दबाव येत असल्याची चर्चा महापालिकेत आहे.

शहरातील सर्वच भागांतील खासगी 'आरओ' प्रकल्पांमधून पाणी देताना नक्की काय काळजी घ्यावी यासाठी, तसेच आरओ प्रकल्प उभारण्याची नियमावली आता महापालिकेने तयार केली आहे. या नियमावलीत देण्यात आलेल्या नियमांचे पालन करण्याचे बंधन हे प्रकल्प चालविणाऱ्यांवर असणार आहे. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी यांनी या नियमावलीला मान्यता दिली आहे.

या नियमावलींमधील नियमांचे पालन 'आरओ' प्रकल्प चालकांना करावे लागणार आहे. नियमावलींची पूर्तता करणाऱ्यांना हे प्रकल्प सुरू करण्याची परवानगी दिली जाणार आहे. ही कार्यवाही सहायक आयुक्त आणि आरोग्य निरीक्षक यांच्या मार्फत केली जाणार, असे महापालिकेने स्पष्ट केले.

### नियमावलीतील ठळक बाबी

- प्रत्येक 'आरओ' प्रकल्पाची महापालिकेकडे नोंदणी करणे बंधनकारक
- 'आरओ' प्रकल्प योग्य असल्याचा दाखला मूळ उत्पादक कंपनीकडून किंवा देखभाल दुरुस्ती करणाऱ्या संस्थेकडून घ्यावा.
- प्रकल्पातील पाणी जागतिक आरोग्य संस्थेच्या आयएस १०५०० (२०१२) नुसार शुद्धीकरण करण्यासाठी हा प्रकल्प योग्य प्रकारे कार्यान्वित असल्याचा दाखला 'आरओ' प्रकल्पचालकांनी सादर करावा.
- राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, पुणे महानगरपालिका प्रयोगशाळेकडून 'आरओ' प्रकल्पातील पाणी पिण्यास योग्य आहे का, याची वारंवार तपासणी करून त्याचा अहवाल महापालिकेला सादर करावा.
- जे प्रकल्प चालक महापालिकेच्या पाण्याचा वापर करत असतील त्यांनी नळजोड नियमान्वित करून, बिगरघरगुती दराने मीटरवर पाण्याचे बिल जमा करावे.
- संबंधित क्षेत्रीय कार्यालयाकडील आरोग्य निरीक्षकांनी या प्रकल्पांमधील पाण्याचे नमुने घेऊन त्यांची तपासणी करावी.
- तपासणीमध्ये पाणी पिण्यास अयोग्य आढळल्यास प्रकल्प बंद करण्याबाबत कार्यवाही करावी.

# तीनशे लालपरींनाही 'एचएसआरपी'चे कवच!

## एसटीचा प्रवासही आणखी सुरक्षित करण्यासाठी पुणे विभाग 31 मार्चपूर्वीच करणार नियोजन




**पुणे | प्रतिनिधी**

एसटीच्या पुणे विभागातील सुमारे 300 बस गाड्यांना आता एचएसआरपी (हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट) बसवण्यात येणार आहेत. यासंदर्भातील हालचाली एसटीच्या पुणे विभाग प्रशासन पातळीवर सुरू झाल्या आहेत. त्यामुळे लवकरच एस.टी. प्रवाशांचा प्रवास अधिकाधिक सुरक्षित होणार आहे.

शहरातील सर्व वाहनचालकांकडून आता शासनाने दिलेल्या मुदतीत आपल्या वाहनाला एचएसआरपी (हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट) बसवण्याचे नियोजन सुरू झाले आहे. या नंबरप्लेट कशा बसवायच्या, कुठे बसवायच्या, ऑनलाईन अर्ज कसा करायचा, याबाबत चर्चा रंगत आहेत.

सन 2019 पूर्वीच्या खासगी वाहनांसह सरकारी वाहनांना देखील आता हायसिक्युरिटी नंबर प्लेट बसवाव्या लागणार आहेत. त्यादृष्टीने इतर वाहनचालकांप्रमाणेच एसटीच्या पुणे विभाग प्रशासनाकडूनही याबाबतची कार्यवाही केली जाणार आहे. 31 मार्च पूर्वीच पुणे विभागाच्या ताफ्यातील 300 बस गाड्यांना या नंबर प्लेट बसवाव्या लागणार आहेत. यासंदर्भातील नियोजन एसटीकडून सुरू आहे, असे एसटी अधिकाऱ्यांनी बोलताना सांगितले.

> आमच्याकडील 300 बस गाड्यांना आम्ही शासनाने दिलेल्या मुदतीपूर्वीच एचएसआरपी (हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट) बसवणार आहे. त्याअनुषंगाने कार्यवाही सुरू झाली असून, गाड्या पासिंग करतेवेळीच या नंबर प्लेट बसवल्या जाणार आहेत.
>
> **- प्रमोद नेहुल, विभाग नियंत्रक, एसटी, पुणे विभाग.**

वाहनांच्या नंबर प्लेटमध्ये छेडछाड व बनावटगिरी करून होणारे गुन्हे कमी करणे, रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांची ओळख पटविणे व राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व वाहनांना एचएसआरपी बसविणे अत्यावश्यक असून, सर्वोच्च न्यायालयाने तसे निर्देशही दिले आहेत. तसेच, केंद्रीय मोटार वाहन नियम 1989 च्या नियम 50 नुसार वाहनाला ही नंबर प्लेट बसविण्याची तरतूद आहे.

रस्ते व महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या जी.एस.आर 1162 (ई) नुसार नवीन वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसविण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. यामुळे आता राज्यासह देशभरातील वाहनांना या नंबरप्लेट बसवल्या जात आहेत. 31 मार्च ही अंतिम मुदत आहे.